## चित्रपट - माझा मुलगा

'माझा मुलगा' हा प्रभातचा सर्वस्वी सामाजिक, मध्यमवर्गीयांच्या नातेसंबंधांवरील कथा असलेले चित्र. या चित्रातील 'पाहू रे किती वाट' आणि 'उसळत तेज भरे गगनात' ही दोन गाणी शांता हुबळीकर यांच्या आवाजात लोकांच्या पसंतीस उतरली. 'उसळत तेज भरे गगनात' या गाण्याच्या वेळी त्या गाण्यात काय आशय हवा आहे हे आठवल्यांना सांगताना व्ही शांताराम म्हणाले होते की, "मला या गाण्यात एखादा बैरागी गातो तसं वर वर जाणारं, आभाळाला भिडणारं काही तरी हवं आहे!" 'पाहू रे किती वाट' यातील समुद्राच्या लाटा वर उसळल्याचा आभास उत्पन्न करणारे विलक्षण ताकदीचे संगीत लक्षणीय आहे.

## चित्रपट - माझा मुलगा

### मज फिरफिरुनी छळीसी का?

मज फिरफिरुनी छळीसी का?

गुणगुणुनी कानी का वदे फुलराणी
मज फिरफिरुनी छळीसी का?

ही गुढ गीते गासी कशाला?
तू भृंग काळा, मी गौर बाला

मी रूपखाणी, पुष्पराणी
वनी रानी नसे कोणी

पाही माझ्यावाणी!
मज फिरफिरुनी छळीसी का?

## चित्रपट - माझा मुलगा

### उसळत तेज भरे गगनात

उसळत तेज भरे गगनात

उजळे मंदिर, शिखर विराजे सोनेरी किरणात
उसळत तेज भरे गगनात.

गाभाऱ्यातील मूर्ति चिमुकली न्हाली तव तेजात.
प्रांगणातले तरु मोहरले पसरे गंध दिशात.

उत्साहाचे भरले वारे पवनाच्या हृदयात.
ओढ लागली त्या तेजाची मम जीवा विरहात.

हृदय परी का अजुनी माझे फिरते अंधारात?
उजळील अंतर कधी 'निरंतर' घेउनी निजरुपात.

## चित्रपट - माझा मुलगा

### जीवा, तुझ्या मोहिनीने भारले

जीवा, तुझ्या मोहिनीने भारले

उफाळूनी येती भाव चित्ती दाटले
जीवा, तुझ्या मोहिनीने भारले.

गूज मन्मनीचे केले खुले तुझ्यापाशी
तुझ्या अंतरीचे गूढ चित्ता नाकळे.

करी पुरी आशा, पदरी टाक वा निराशा
फिरायची मागे ही न आता पाऊले.

धरी शिरी अनुरागे, वा दुरी फेक रागे
सुको मुको प्राणा, पुष्प पायी वाहिले.

लपंडाव हा जिवाला गमे पापदायी
कधी व्हायचे हे उमाळे मोकळे?

## चित्रपट - माझा मुलगा

### पाहू रे किती वाट?

पाहू रे किती वाट? जिवलगा
पाहू रे किती वाट?

हिंडते धुंडिते होई न भेटी
प्रीतीचे निधान येई न हाती
झाली बाला श्रांत, जिवलगा, पाहू रे किती वाट?

वन सळसळते, मन तळमळते
प्राणसख्या तव चाहूल येते
भेसूर घन तिमिरात, जिवलगा, पाहू रे किती वाट?

सागर खवळे, उसळती लाटा
झुंजत तयांशी हासशी नाथा
काहूर मम हृदयात, जिवलगा, पाहू रे किती वाट?

होईल केंव्हा मीलन अंती?
अवचित जुळतील प्रीति ज्योती
विश्वाच्या प्रलयात, जिवलगा, पाहू रे किती वाट?

पाहीन तोवरी वाट, पाहीन तोवरी वाट,
जिवलगा, पाहीन तोवरी वाट!